CNR - MHKO130001172013

सिंधूताई पाटील वगैरे विरुध्द बापू राजाराम पाटील वगैरे

# नियमित दिवाणी कज्जा नं.०४/२०१३ मधील निशाणी क्र.५६ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम ५ अन्वये निशाणी क्र. २३ खालील काढलेले मुद्दयामध्ये मुद्दा क्र. १ मध्ये तारीख दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, मुद्दा क्र. १ मध्ये खरेदीपत्राची तारीख ३०/११/१९७१ अशी दर्शविण्यात आली आहे. वास्तविक पाहता, खरेदीपत्र हे तारीख ३०/१२/१९७१ रोजी झालेले आहे. त्यामुळे सदरची तारीख दुरुस्ती होण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

३. प्रतिवादीनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले असून अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी खोडसाळपणे केला असल्याने वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्जातील वादीची विनंती लक्षात घेता, वादीची मुद्दा क्र. १ मध्ये तारीख ''३०/११/१९७१'' ऐवजी ''३०/१२/१९७१'' असे नमूद करण्यात यावी अशी विनंती आहे असे दिसून येते. खरेदीपत्राची मूळ प्रत अभिलेखावरती दाखल आहे. त्याचे अवलोकन करता, प्रथमदर्शनी खरेदीपत्र केल्याची तारीख ३०/१२/१९७१ अशीच दिसून येत आहे. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्याकरीता सदरची दुरुस्ती करणे गरजेची वाटते. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य राहील असे वाटते. वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**- आदेश -**

१. अर्ज (निशाणी क्र. ५६) मंजूर करण्यात येतो.

२. दाव्यामध्ये निशाणी क्र. २३ खाली काढण्यात आलेल्या मुद्दयापैकी मुद्दा क्र. १ मधील तारखेमध्ये "३०/११/१९७१'' ऐवजी "३०/१२/१९७१'' अशी दुरुस्ती करण्यात यावी.

३. खर्चासंबंधी कोणताही आदेश नाही.

सही/-

कागल (ए.बी.जवळे)

दिनांकः– ०५/१०/२०२१ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.